महाराष्ट्र शासन

महसूल विभाग

# जिल्हा दंडाधिकारी चंद्रपूर यांचे कार्यालय

ई-मेल : chandrapur.rdc@ gmail.com दुरध्वनी क्रमांक- 07172-250659

क्रमांक.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2021/569 दिनांक : 04 जुन, 2021

---

**वाचा** :- 1. साथरोग कायदा, 1897

2.आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 चे कलम 30, 33, 34, 41 व कलम 51

3. फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973

4. मा. मुख्य सचिव, महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन आदेश क्र. डीएमयु/ 2020/ सीआर,92/DisM-1 दि. 13/04/2021.

5. या कार्यालयाचे आदेश क्र.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2021/426 दि. 14.04.2021.

6. मा. मुख्य सचिव, महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन आदेश क्र. डीएमयु/ 2020/ सीआर,92/DisM-1 दि. 21/04/2021.

7. या कार्यालयाचे आदेश क्र.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2021/470 दि. 22.04.2021.

8. मा. मुख्य सचिव, महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन आदेश क्र. डीएमयु/ 2020/ सीआर,92/DisM-1 दि. 29/04/2021.

9. या कार्यालयाचे आदेश क्र.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2021/492 दि. 29.04.2021.

10. मा. मुख्य सचिव, महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन आदेश क्र. डीएमयु/ 2020/ सीआर,92/DisM-1 दि. 12/05/2021.

11. या कार्यालयाचे आदेश क्र.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2021/520 दि. 13/05/2021.

12. मा. मुख्य सचिव, महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन आदेश क्र. डीएमयु/ 2020/ सीआर,92/DisM-1 दि. 30/05/2021.

---

## : : आदेश : :

ज्याअर्थी, आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील कलम 25 अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे व त्यातील पोट कलम 2 (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

आणि ज्याअर्थी, राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग कायदा,1897 दिनांक 13 मार्च,2020 पासून लागू करुन खंड 2, 3, व 4 मधील तरतुदींची अंमलबजावणीसाठी अधिसूचना निर्गमित केलेली आहे व त्याबाबतची नियमावली प्रसिध्द करुन जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी घोषीत केलेले आहे.

आणि ज्याअर्थी, कोरोना (कोविड-19) विषाणूच्या संसर्गाचा प्रादुर्भाव झपाटयाने वाढत असल्याने मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचेव्दारे संपूर्ण महाराष्ट्र राज्याचे क्षेत्रात **"ब्रेक दि चेन"(BREAK THE CHAIN)** अंतर्गत संदर्भ क्र. 4 व 6 चे आदेशान्वये, कोरोना विषाणूच्या वाढत्या पार्श्वभुमीवर संपूर्ण महाराष्ट्रात काही ठरावीक बाबींस दि. 30.04.2021 पावेतो प्रतिबंध करुन कडक निर्बंध लावण्याबाबतचे आदेश निर्गमीत केलेले असल्याने, राज्य शासनाकडील उक्त आदेश व त्यानुषंगाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या आदेशातील संपूर्ण तरतूदी/ कडक निर्बंध चंद्रपूर जिल्हयातील कार्यक्षेत्रात संदर्भ क्र. 5 व 7 चे आदेशान्वये दिनांक 30 एप्रिल, 2021 पावेतो यथास्थिती लागु करण्यात आलेले होते. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचेव्दारे संदर्भ क्र. 10 चे आदेशान्वये, सदर तरतुदी/कडक निर्बंधास संपूर्ण महाराष्ट्रामध्ये दि. 01 जुन, 2021 पर्यत मुदतवाढ देण्यात आलेली असल्याने या कार्यालयाचे संदर्भ क्र. 11 चे आदेशान्वये, संदर्भ क्र. 4 व 6 चे

अनुषंगाने निर्गमीत या कार्यालयाकडील संदर्भ क्र. 5 व 7 चे आदेश व त्यानुषंगाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या आदेशास, चंद्रपूर जिल्हयाचे कार्यक्षेत्रात दि. 01 जुन, 2021 चे सकाळी 07.00 वाजेपावेतो मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांनी संदर्भ क्र. 12 चे आदेशान्वये, संपूर्ण राज्यात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव मोठया प्रमाणात कमी होत असल्याचे पार्श्वभुमीवर, संदर्भ क्र. 4 व 6 चे आदेशान्वये लागू करण्यात आलेल्या कडक/प्रतिबंधात्मक निर्बधास काही प्रमाणात शिथीलता देऊन संपुर्ण महाराष्ट्रामध्ये नविन प्रतिबंधात्मक तरतुदी/सुचना दि. 15 जुन, 2021 चे सकाळी 07.00 वाजेपावेतो लागू केलेल्या आहेत.

त्याअर्थी, **मी, अजय गुल्हाने, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, चंद्रपूर**, राज्य शासनाकडील संदर्भ क्र. 4 व 6 चे आदेशाचे अनुषंगाने निर्गमीत या कार्यालयाकडील **संदर्भ क्र. 5 व 7 चे आदेशातील तरतुदी/निर्बंध (त्यानुषंगाने पारीत केलेल्या इतर आदेशासह), राज्य शासनाचे संदर्भ क्र. 12 चे आदेशान्वये शिथील केलेल्या खालील प्रतिबंधात्मक तरतुदी/सुचनांसह संपूर्ण चंद्रपूर जिल्हयाचे कार्यक्षेत्रात दि. 15 जुन, 2021 चे सकाळी 07.00 वाजेपावेतो यथास्थिती लागु करीत आहे.** सर्व संबंधीत प्रशासकीय विभाग प्रमुख यांनी उपरोक्त आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

1. संपूर्ण चंद्रपूर जिल्हयातील संदर्भ क्र. 5 चे आदेशात वर्गीकृत केलेल्या अत्यावश्यक सेवा (वैद्यकीय क्षेत्राशी निगडीत सेवा वगळून) सकाळी 07.00 ते दुपारी 02.00 या वेळेत कोविड विषयक वर्तणुक नियमांचे काटेकोरपणे पालन करुन सुरु ठेवण्यास परवानगी राहील .
2. संपूर्ण चंद्रपूर जिल्हयातील अत्यावश्यक सेवांव्यतिरिक्त इतर सर्व प्रकारची एकल दुकाने/आस्थापना (मॉल्स/शॉपींग कॉम्प्लेक्स/सुपर बाजार/सलुन/स्पा/जिम इत्यादी वगळून) सोमवार ते शुक्रवार सकाळी 07.00 ते दुपारी 02.00 या वेळेत कोविड विषयक वर्तणुक नियमांचे काटेकोरपणे पालन करुन सुरु ठेवण्यास परवानगी राहील. **सदर एकल दुकाने/आस्थापना शनिवार व रविवार या दिवशी संपुर्णत: बंद ठेवण्यात यावी .**
3. चंद्रपूर जिल्हयातंर्गत अत्यावश्यक सेवा/वस्तु तसेच अत्यावश्यक सेवांव्यतिरिक्त इतर प्रकारची सेवा/वस्तु ई- कामर्स च्या माध्यमातुन सकाळी 07.00 ते रात्री 08.00 या वेळेत वितरीत करण्यास परवानगी राहील.
4. चंद्रपूर जिल्हयातील नागरीकांना दुपारी 03.00 या वेळेनंतर वैद्यकीय किंवा इतर आणीबाणी प्रसंग तसेच घरपोच सेवा या कारणांशिवाय बाहेर येण्या-जाण्यावर निर्बंध असतील.
5. राज्य शासन आणि स्थानिक प्रशासनाशी संबंधित सर्व शासकीय कार्यालये 25 टक्के कर्मचारी क्षमतेने कार्यरत राहतील. तथापी कोविड-19 संबंधित अत्यावश्यक सेवांच्या कार्यालयांना यातून वगळण्यात येत आहे. तसेच इतर शासकीय कार्यालयांच्या बाबतीत अधिक उपस्थितीकरीता संबंधित कार्यालय प्रमुख यांनी स्थानिक आपत्ती प्राधिकरणाची परवानगी घेऊन योग्य तो निर्णय घ्यावा.
6. चंद्रपूर जिल्हयांतर्गत दुकाने/आस्थापना यांना पुरवठा केल्या जाणा-या वस्तुंच्या मालवाहतुकीवर कोणतेही निर्बंध असणार नाहीत. मात्र दुकानदारांना ठरवून दिलेल्या वेळेनंतर ग्राहकांना विक्री करता येणार नाही. या नियमांचा भंग केल्यास अशी दुकाने/आस्थापना कोरोना साथ संपेपर्यंतच्या कालावधीकरीता बंद ठेवण्यात येईल तसेच यापुर्वीच्या आदेशातील नमुद तरतुदीनुसार दंड सुध्दा आकारण्यात येईल.

सदर आदेशाची कोणतीही व्यक्ती, संस्था किंवा संघटना यांनी अंमलबजावणी करण्यास टाळाटाळ केल्यास अथवा विरोध दर्शविल्यास संबंधीताविरुध्द आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 चे कलम 51 ते 60 व भारतीय दंड संहिता 1860 चे कलम 188 तसेच साथरोग कायदा 1897 अन्वये दंडनीय/कायदेशीर कार्यवाही संबंधीत पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांनी करावी.

**सदर आदेश संपुर्ण चंद्रपूर जिल्हयाचे कार्यक्षेत्रात दिनांक 07.06.2021 चे सकाळी 07.00 वाजेपासून ते दिनांक 15.06.2021 चे सकाळी 07.00 वाजेपर्यंत लागु राहतील.**

**सदर आदेश माझे सही व शिक्क्यानिशी दि. 04.06.2021 रोजी निर्गमीत करण्यात येत आहे.**

सही/-
(अजय गुल्हाने)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, चंद्रपूर**

**<u>प्रतिलीपी</u> :- <u>माहितीस सविनय सादर</u>.**

1. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-032
2. मा. सचिव, आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, मदत व पुनर्वसन, महसुल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई – 032
3. मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर

**माहितीस तथा उचित कार्यवाहीस्तव.**

4. पोलीस अधिक्षक, चंद्रपूर
5. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर
6. आयुक्त, चंद्रपूर शहर महानगरपालीका, चंद्रपूर
7. जिल्हा माहिती अधिकारी, चंद्रपूर
8. उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, चंद्रपूर
9. उपजिल्हाधिकारी (रोहयो) तथा नोडल अधिकारी, जि.का. चंद्रपूर
10. उपविभागीय दंडाधिकारी (सर्व)
11. तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी (सर्व)
12. संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
13. मुख्याधिकारी, नगर परिषद/नगर पंचायत (सर्व)
14. सर्व शासकीय विभाग प्रमुख/बँक व्यवस्थापक

**सदर आदेशास उपरोक्त अधिकारी यांनी प्रसिध्दी द्यावी.**

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, चंद्रपूर**

D/ Rajesh Nikhare/144/BREAK THE CHAIN Order